Vol 3 Issue 5 June 2013

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

Indian Streams Research Journal
Volume 3, Issue. 5, June. 2013
ISSN:-2230-7850
Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# पेशवेकालीन सावकारीची कार्ये

प्राचार्य डॉ. बी.व्ही. चौधरी

वसुंधरा कला महविद्यालय, जुळे सोलापूर, सोलापूर.

## 1) पेशवेकालीन सावकारीचा उदय :

18 व्या शतकात महाराष्ट्रात पेशव्यांची सत्ता सुरू झाली. त्याचबरोबर महाराष्ट्रात सावकारशाहीचा उदय झाला आणि विस्तारही झाला असेच म्हणावे लागेल. कारण स्वतः पेशवे हे सतत आर्थिक अडचणीत असत. त्यांना नेहमीच पैशाची गरज भासे. तेव्हा ते मोठमोठया रकमा सावकाराकडून व्याजाने घेत असत. स्वतः पेशवेच सावकारशाहीला प्रोत्साहन देत आहे असे म्हटल्यावर पेशवाईत सावकारांचा विकास होणारच आणि तसेच घडले. ही ऐतिहासिक वस्तुस्थिती पेशवेकालीन ऐतिहासिक कागदपत्रांतून पहावयास मिळते.

पेशवेकालीन सावकारीचा उदय हा सरंजामशाहीतून झाला. ग्रामीण भागातील शेतसारा वसुली, जकात वसुली आदी कामे कुलकर्ण्यांकडे असत. हे कुलकर्णी ब्राह्मण असत. पेशवेही स्वतः ब्राह्मण होते. ब्राह्मणाविषयी त्यांना जास्तच आदर व कळवळा होता. याच कुलकर्ण्यांनी जवळ असलेला पैसा ग्रामीण भागातील अडल्यानडल्या लोकांना व्याजाने देऊन सावकारी करण्यास सुरूवात केली. पेशव्यांनी कुलकर्ण्यांच्या या वृत्तीकडे दुर्लक्ष केले आणि या वृत्तीतून महाराष्ट्रात छोटया, मोठया सावकारांचा उदय झाला. याचाच अर्थ पेशवेकालीन सावकारशाहीच्या उदय–विस्तारात पेशव्यांचे सहकार्य हेच प्रमुख कारण होय. या उदय–विस्ताराची ऐतिहासिक कागदपत्रे पाहता या सावकारांत ब्राह्मणवर्गाचा सहभाग मोठा होता हे दिसून येते.

पेशवेकालीन सावकारी व्यवहार आणि बँकिंग व्यवहाराची माहिती घेत असताना हे लक्षात येते की, आधुनिक पध्दतीच्या बँका 18 व्या शतकामध्ये महाराष्ट्रामध्ये नव्हत्या. इ.स. 1720 मध्ये मुंबईमध्ये एक बँक स्थापन झाली होती असा संदर्भ मिळतो. बँकांचे मुख्य काम म्हणजे ठेवी स्वीकारणे, सभासदांना कर्ज देणे, त्यापोटी काही इस्टेट लिहून घेणे, चलनांचा विनिमय करणे, सरकारला कर्ज देणे इत्यादी कामे 18 व्या शतकात सावकार घराणी करीत असत. हल्लीसारख्या बँका एक संस्था म्हणून त्यावेळी अस्तित्वात नव्हत्या. सावकारांना अर्थव्यवहारामध्ये मानाचे स्थान असे. प्रो.जी.टी. कुलकर्णी यांच्या मते, 18 व्या शतकातील महाराष्ट्रातील सावकार पैशाच्या व्यवहारात म्हणजे देणे व घेणे यांच्याशी संबंधित होते. परंतु पतनिर्मितीमध्ये अशा सावकारांचा सहभाग नसे. 18 व्या शतकातील सावकार घराणे आर्थिक व्यवहारामध्ये पुढील कामे करीत असत.[1]

– ठेवी स्वीकारणे.
– सरकार, व्यापारी, सैन्यातील अधिकारी व व्यक्ती यांना कर्जे देणे.
– चलन व सोन्या–चांदीच्या लगडी आणून विकणे.
– चलनाचा विनिमय करणे.
– रूपये किंवा इतर नाण्याचे मूल्यमापन करणे.
– हुंडया देणे व घेणे इत्यादी.

***अ)ठेवी स्वीकारणे :***–दीक्षित–पटवर्धन या पेशवेकालीन सावकारांच्या जमाखर्चाच्या वहीवरून पेशवेकालीन सावकार कशाप्रकारे ठेवी गोळा करीत असत याची माहिती मिळते. अशा ठेवी घेऊन सावकार आपल्या व्यवहारास सुरूवात करीत. ठेवीदारांना योग्य व्याज देत. ते व्याज मासिक असे. ज्यावेळी ठेवीवर पैसे परत मागतील तेव्हा त्यांचे पैसे परत करून सावकार बाजारात आपली पत वाढवीत असत.

***ब) कर्जपुरवठा करणे :***– व्यापार व उद्योगधंद्याच्या वाढीसाठी विविध प्रकारच्या लोकांना कर्ज पुरवठा करणे हे सावकाराचे महत्त्वाचे काम असे. पेशवे सतत कर्जबाजारी असल्याने पेशव्यांना कर्ज पुरविणे हा अनेक सावकारांचा व्यवसाय असे. अशा कर्जावर मासिक एक टक्का व्याज असे. सरकार सावकारांच्या नावे डिमांड ड्राफ्ट पाठवून पैसा गोळा करीत असे. सावकारांच्या दृष्टीने सर्वच कर्जे सुरक्षित नसत. ज्या प्रकरणामध्ये सावकाराने कर्जाच्या मोबदल्यात तारण घेतले असेल ते कर्ज व्याजासह परत येत असे. परंतु ज्यांना तारणाशिवाय कर्ज दिले जात असे अशा प्रकारचे कर्ज बुडण्याची शक्यता असे. सैन्यातील अधिकाऱ्यांना वैयक्तिक पतीवर कर्ज देत; परंतु अशा प्रकारचे कर्ज अल्प मुदतीचे असे. सुभेदार व कमावीसदार बॉण्ड देवून कर्ज काढीत व सरकार दरबारी महसूल भरणा करीत. काहीवेळा सरकार दरबारी नोकरांचा मासिक पगार देण्यास पैसा नसेल तर सावकार सरकारला अल्पमुदतीचे कर्ज देत असे. व्यापारीसुध्दा अल्पमुदतीचे कर्ज घेऊन आपला व्यवसाय करीत असत. अशा परिस्थितीत व्याजाचा दर परिस्थिती, व्यक्ती, त्यांचे समाजातील स्थान यावर अवलंबून असे. अशा व्याजाचा दर मासिक शेकडा अर्धा रूपयापासून दोन रूपयांपर्यंत असे. व्याजाचा दर दीर्घमुदतीच्या कर्जाचा कमी व अल्पमुदतीच्या कर्जाला जास्त असे.

काही वेळा वैयक्तिक जबाबदारीवर कर्जपुरवठा होत असे. त्यावेळी व्याजाचा दर शंभर रूपयास महिन्यास आठ आणे असे. सावकार कर्जदाराकडून त्याचे दुकान किंवा घर तारण घेत असत. कर्जरोखे व्याज रोखे देण्याची ही पध्दत होती. याद्वारे पैसा उभा केला जात असे.[2]

***क) चलन सोन्याचांदीच्या लगडी विकणे :***–जेथे चलन व लगडी मिळतील तेथुन त्या विकत घेणे व त्या बाजारात विकणे हाही सावकाराचा धंदा असे. खरेदी विक्रीच्या व्यवहारातील फरक हाच सावकाराचा फायदा असे.

मोहोर, होन एका दराने विकत घेऊन जास्त दराने विकून सावकार फायदा मिळवित असत. खरेदी–विक्री मधील फरक सव्वा रूपया ते पावणे दोन रूपये एवढा असे. सोन्याचा दर तोळयाला पंधरा रूपये असे. विक्रीचा दर साडेपंधरा रूपये असे.[3]

***ड) चलनाचा विनिमय करणे :*** एका प्रकारचे चलन घेऊन त्याचे दुसऱ्या प्रकारच्या चलनामध्ये रूपांतर केले जात असे.

***इ) रूपये किंवा इतर नाण्याचे मूल्यमापन करणे :***– पेढीकडे येणारी नाणी खरी–खोटी आहेत हे तपासून पाहिले जात असे. त्याचेसुध्दा दर ठरलेले असत. पैशाच्या मूल्यमापनाचा दर शंभर रूपयास चार आणे किंवा रूपयास सहा आणे इतका असे.

***ई) हुंडया देणे–घेणे :***–18 व्या शतकातील सावकारांचा सर्वात प्रसिध्द व महत्त्वाचा व्यावसाय म्हणजे हुंडी व्यवहार होय. हुंडीच्या रूपाने पैशाची उपलब्धता करून दिली जात असे. हुंडयाच्या देवाणघेवाणीने मोठमोठया रकमांची उलाढाल होत असे. पेढयांना व हुंडयांच्या रोख व्यापाऱ्याने मालखरेदी करणाऱ्या माणसाच्या नावाने केलेला एक उधारीचा दस्तऐवज होय. हुंडी सादर करणाऱ्या व्यक्तीला अथवा पेढीच्या प्रतिनिधीला विकत घेतलेल्या मालाची किंमत रोख देण्यासंबंधीची सूचना हुंडी देणारा व्यापारी माल विकत घेणाऱ्या व्यापाऱ्याला हुंडीच्या रूपाने देत असे. अशा हुंडयांना डिमांड ड्राफ्टचे स्वरूप होते अशा प्रकारच्या हुंडया देण्याची मुख्य कारणे अशी होती.

अ)दळणवळणाची साधने अपुरी असत.
ब)रस्ते चांगले नसल्याने व वाटेत लुटमारीची भीती असल्याने कोणतीही व्यक्ती मोठी रक्कम बरोबर नेण्यास तयार नसे.
क)व्यवहाराची रक्कम पैशाच्या स्वरूपात असल्याने थैलीतून वाहून नेणे कष्टाचे असे म्हणून हुंडी व्यवहार महत्त्वाचा ठरत असे.
ड)खंडणीची रक्कमही हुंडी व्यवहारातून सोपी होत असे.

***हुंडीचे सर्वसाधारण चार प्रकार असत.***

***1) दर्शनी हुंडी :*** एखाद्या ग्राहकांकडून रोख रक्कम घेऊन एखाद्या पेढीचा प्रतिनिधी, दुसऱ्या शहरातील दुसऱ्या एखाद्या पेढीच्या प्रतिनिधीस सदरहू रक्कम सदरच्या ग्राहकाला त्या शहरात रोखीच्या रूपाने देण्याबद्दलची सूचना अशा हुंडीच्या रूपाने देत असे. म्हणजेच हुंडी पेढीवर सादर केल्यावर ताबडतोब रक्कम रोख घ्यावी अशी सूचना ज्या हुंडीमध्ये असे त्याला 'दर्शनी हुंडी' असे म्हणत.

***2) मुदती हुंडी :***–एखाद्या व्यापाऱ्याला विशिष्ट कालानंतर रोख रक्कम देण्याबद्दलची सूचना असणाऱ्या हुंडीला 'मुदती हुंडी' म्हणत.

***3) लहानी हुंडी :***–एखाद्या गृहस्थाने एखाद्या पेढीवर हुंडी दिली व त्याची त्या पेढीमधील खात्यामध्ये पुरेशी रक्कम शिल्लक नसेल व त्याने दुसऱ्या एखाद्या पेढीमध्ये सदरची रक्कम रोख भरलेली असेल व त्याबद्दलची हुंडी पहिल्या पेढीच्या नावे घेतली असेल तर अशा हुंडीला 'लहानी हुंडी' असे म्हणत.4

***4) वरात :***–सरकारने काढलेल्या हुंडीला 'वरात' असे म्हणत असत. जेव्हा सरकारी नोकरांकडून, व्यापाऱ्यांकडून अथवा इतर खाजगी व्यक्तीकडून सरकारला मोठया रकमाचे येणे लवकर करायचे असे तेव्हा अशी वरात काढली जाई. कमावीसदारांना आगाऊ दिलेल्या रकमा म्हणजे रसद रकमा ज्यावेळी वसूल करून घ्यायच्या असत तेव्हा अशा वरात (हुंडया) काढल्या जात. अशा प्रकरणामध्ये रसद म्हणून दिलेल्या रकमेएवढया किंमतीची 'वरात' सरकारकडून सदर कमावीसदाराचे नाव काढले जाई. ही वरात तिच्यात लिहिलेल्या आकडयांप्रमाणे रोख रक्कम सरकारला देऊन एखादी पेढी विकत घेत असे व नंतर ती रक्कम त्या पेढीचा मालक वा प्रतिनिधी सदर कमावीसदाराकडून वसूल करत असे. काही वेळा सरकार आपल्या राज्यातील काही प्रांतांच्या अधिकाऱ्यांकडून रकमा कर्जाऊ घेत असे व त्याकरीता भावी काळातील 'रसद' बदली म्हणून धरली जाई असे व्यवहार करताना सुध्दा 'वरात' काढून केले जात. इ.स. 1734 मध्ये (आर्षा सितैन भया व अलफ, साबान) पेशवे सरकारने अशा 'वरात' अवचितगड तालुक्याचे रामचंद्र कृष्ण यांचे नावे रू. 1,000 साठी, परशुराम रामचंद्र कृष्ण यांचे नावे रू. 3,300 साठी, नारो गोविंद यांचे नावे रू. 6,700 साठी, बाळाजी महादेव यांचे नावे रू. 15,000 साठी, कर्नाळा तालुक्याचे रामजी महादेव यांचे नावे रू. 15,000 साठी व कोकण प्रांताचे सरसुभेदार शंकरराजी केशव यांचे नावे रू. 25,000 साठी काढल्याचे उल्लेख आढळतात. हे एकूण 76,000 रूपयाचे वर दिलेल्या अधिकाऱ्यांकडून घेतलेले कर्ज परत करण्यासाठी नंतर पेशवे सरकारने दुसरी 'वरात' तालुक्याच्या मोरोजी शिंदे यांचे नावे काढली होती. मूळ मुद्दलाची परतफेड होईपर्यंतच्या काळासाठी त्यांनी दिलेल्या कर्जाऊ रकमेवर दरसाल दरशेकडा 12%दराने व्याज त्यांना दिले गेले. असे व्याजदर महिन्याच्या मुदतीनंतर कोकण प्रांतांच्या महसूलातून दिले गेले.[5]

पेशवे सरकार आपल्या कमाविसदाराच्या नावे त्यांच्या 'रसदा' यासाठी 'वरात' काढत असत व त्या 'वरात' पेढीवाल्यांना विकून पैसा उभा करीत असत. या पध्दतीबरोबरच आपल्याला असेही आढळते की, कमावीसदार व इतर सरकारी अधिकारी एखाद्या महालाची कमाविशी अगर मामलत आपल्या नावे सुरक्षित रहावी म्हणून सरकारला द्यावे याच्या ठराविक रकमा देण्याविषयी पेढीदारांना विनंती करीत असत. गोविंद शामराव याला शहाबाज प्रांताची मामलत मिळावयाची होती. या मामलतीसाठी सरकारात भरणा करण्याची 'रसद' देण्यासाठी त्याजकडे पुरेसे पैसे नव्हते. ती मामलत बहुधा विठ्ठल शिवदेव विंचूरकर यांच्याकडे होती. तेव्हा त्याने विठ्ठल शिवदेव विंचूरकर यांच्या नोकरीत असलेल्या अप्पाजी रघुनाथ यास पुणे मुक्कामी दोन चिटयाच्या रूपाने 9,158 रूपये देण्याविषयी पेढीचे मालक बाळंभट व विश्वनाथ भट वैद्य यांना सांगितले. या दोन चिठ्ठीत अनुक्रमे 9,000 रूपये व 158 रूपयांच्या होत्या. पेढीवाल्यांना बहुधा असे सांगण्यात आले होते की, काही विशिष्ट अधिकाऱ्यांकडून त्यांनी जहागिरीचा महसूल गोळा करावा व ती रक्कम त्यांच्याकडे ठेव म्हणून ठेवून घ्यावी किंवा सूचनेप्रमाणे खर्च करावी. 23 मे 1740 रोजी चिमणाजी नारायण सचिव यांनी वैद्य बंधू पेढीवाले यांना विनंती केली की, त्यांच्याकडे भिकमशेठ यांचे बरेच दिवसाचे देणे असलेली रक्कम रूपये 2,000 त्यांनी भिकमशेठ सचिव यांचेकडे असलेल्या बीड प्रांताच्या महसूलच्या रकमेतून देऊन टाकावी.[6]

या पेढयांचे आणखी एक कामकाज म्हणजे आपल्या ग्राहकांना प्रसंगी एखादा व्यापार वा उद्योग सुरू करण्यासाठी कर्ज देणे हे होते. राघोबा दरवे नावाच्या एका माणसाने अशा रितीने कर्जे देण्याविषयी वैद्य बंधूच्या पेढीकडे अर्ज केल्याबद्दलची 2 डिसेंबर 1740 या दिवशी नोंद आढळते.

याशिवाय या पेढयांकडून काही गोष्टींचा गहाणावर कर्जाऊ रकमा देण्याचे व्यवहार झालेलेही आढळून येतात. काही बाबतीत एखादी मामलत अथवा कमाविशी हीच गहाण ठेवलेली आढळून येते. अशी मामलत एकाच वेळी भागीदारीमध्ये रत्नाकर विठ्ठल व वैद्य बंधू यांच्या पेढयांकडे 12,000 रूपयांसाठी गहाण ठेवलेली होती या संबंधीचे आहे.

***व्याजाचा दर :***– कर्जावर आकारला जाणारा व्याजाचा दर भरमसाठ असे. त्याकाळी कर्जरोखांमध्ये व्याजाचा दर दरसालासाठी नसून दरमहा आकारला जाई. तो दरशेकडा दरमहा आकारला जाई. तो दरशेकडा दरमहा 1%पासून 5%पर्यंत बदलत असे. म्हणजेच दरसाल दरशेकडा 12:टक्क्यापासून 60% टक्क्यांपर्यत असे. हा व्याजाचा दर खरोखरच भरमसाठ होता. व्याजाची रक्कम फारच थकल्यास साधारणपणे त्या

रकमेच्या 1/12 इतकीच रक्कम व्याज म्हणून दिली जात असे. काही प्रकरणांमध्ये अशी सवलत देवूनसुध्दा काही व्याजाची रक्कम येणे रहात असे. त्यावेळी ती रक्कम सूट म्हणून कमी करून त्या कर्जदाराचे खाते बंद करून टाकल्याचे आढळते. काही प्रसंगी कर्जावरील व्याज पैशाच्या रूपाने न देता वस्तूंच्या रूपाने दिले जात असे.

साधारणपणे कर्जरोखा अगर वचनचिठ्ठीही कर्जदाराने धनकोला लिहून द्यायची पध्दत होती. 11 सप्टेंबर 1737 या दिवशी मल्हारराम घारपूरे याने त्याचा धनको काळोजी जगताप याला रू. 1022–8–0 या रकमेची वचनचिठ्ठी लिहून दिली होती. तिच्यामध्ये त्याने रकमेची मागणी करताच सदर रक्कम भरण्याबद्दल लिहून दिले होते. 3 नोव्हेंबर 1737 रोजी कोणा एका जानोजी भोईटे याने आपला सावकार भास्कर बाबा वैद्य याला 500 रूपयाचा कर्जरोखा लिहून देतांना सदरहू रक्कम एक वर्षानंतर कार्तिक वद्य 5 शके 1660 रोजी तिच्यावरील दरशेकडा दरमहा 3ःम्हणजे दरसाल दरशेकडा 36ःव्याजासहित परत देण्याचे कबूल केले होते.[7]

एखाद्या कर्जदार माणसाकडे कर्जाची परतफेड करण्यासाठी रोख रक्कम नसल्यास तो आपली एखादी स्थावर अगर जंगम मिळकत सावकाराला कर्जापोटी देऊन कर्जाच्या ओझ्यातून मोकळा होत असे.

8 ऑक्टोबर 1768 रोजी झालेल्या एका नमूनेदार गहाणखतामध्ये ऋणको शिवाजी नरहर देशमुख यांनी धनको रामाजी बल्लाळ जोशी याला लिहून दिलेल्या पुढील तपशीलाची नोंद आढळते. 8,600 रूपयांचे कर्ज दरमहा दरशेकडा 1 टक्का व्याजदराने घेतलेले होते. व्याज कसे परत करावयाचे याबद्दल अगर अंशतः व्याज परत करण्याबद्दल काहीच अट लिहिलेली नाही. कर्जाची परतफेड अकारी नाण्यामध्ये करावयाची होती. कर्ज 5 महिन्यांच्या मुदतीसाठी घेतलेले होते पण कर्ज व्याजासह वरील मुदतीत परत न केल्यास पुढे व्याजाचा दर दरमहा दरशेकडा 2ः टक्के पडणार होता. हे कर्ज रत्नखचित शिरपेच, माणिक, हिरे, सोन्याची अंगठी, मोत्याची माळ इत्यादी सुमारे 2,000 रूपयांचे दागिने, एक घर व ओंकारेश्वर मंदिराजवळील जागा यांच्या गहाणावर दिलेले होते. हा व्यवहार करीत असताना दोन साक्षीदार हजर होते.[8]

अशा प्रकारे 18 व्या शतकातील सावकारी व्यवहार स्वरूप ऐतिहासिक कागदपत्रावरून दिसून येते.

### *1)व्यापारी व्यवसायातून सावकारीचा उदय :*

सावकार वर्गाच्या जोडीने व्यापारी वर्गही 18 व्या शतकात महाराष्ट्रामध्ये तत्कालीन विशिष्ट राजकीय आर्थिक परिस्थितीमुळे उदयास येऊ लागला होता. कर्जाच्या बरोबरीने सरकारला अनेक कारणांसाठी प्रशासकीय, लष्कर, राजनैतिक, सणसमारंभ व इतर कारणांसाठी विविध जिनसा सदैव लागत असत. त्यांचा सरकारला पुरवठा होण्याचे मुख्य मार्ग म्हणजे शेतसाऱ्याच्या रूपाने पिकातील काही भागाची वसुली, जकातीच्या रूपाने वसूल होणारा व वाहतुकीत गुंतलेला काही माल वगैरे होते. याशिवाय बाजारातून खरेदी केलेल्या वस्तू या रोख किंवा प्रत्यक्ष उधारीनेच असत. सरकारच्या खरेदी व्यवहारात कापडचोपड हा सर्वात प्रमुख जिन्नस होता. पेशवे सरकारच्या हिशोबी कागदपत्रात जिनसांच्या आयव्याचे सरकारी हिशेब, ऐनजिनसी या नावाखाली स्वतंत्रपणे नोंदवून ठेवले जात असे. ते पुणे दफ्तरखात्यातील घडणी दफ्तरातील रूमाल क्रमांक 748 मध्ये उपलब्ध असलेल्या या विषयीच्या आकडेवारी उदाहरणावरून याची कल्पना येते.

पेशवे सरकारने कापड व इतर जिन्नसा खरेदी केल्या त्यांच्या रूपयात हिशेब –
पुढील आकडेवारीवरून इतर जिन्नसांच्या मानाने सरकार कापडाची उधारीवर खरेदी किती मोठया प्रमाणावर करीत असे याची कल्पना येते.

| वर्ष | कापड | इतर जिन्नसा |
|---|---|---|
| 1763–64 | 3,16,402 | 16,004 |
| 1765–66 | 1,50,712 | 28,742 |
| 1767–68 | 3,32,512 | 17,200 |
| 1769–70 | 2,17,600 | 9,848 |
| 1771–72 | 5,13,437 | 12,392 |

उधारीच्या जोडीला रोखीनेही व्यवहार होत असे. शेतसारा, जप्ती इत्यादीच्या रूपाने धान्यादी जिन्नस सरकारकडे मोठया प्रमाणावर जमा होत. यातील अतिरिक्त जिन्नस बाजारात विकून जे पैसे येत तेही आवश्यक त्या वस्तू रोखीने खरेदी करण्यासाठी सरकारला पुन्हा वापरता येत. अशा रोखीने केलेल्या कापड खरेदीचेच एखाद्या वर्षाचे उदाहरण घेता येईल. 1763–64 या एका वर्षी केवळ पेशवे सरकारने पंचवीस लाखाहून अधिक रूपये किंमतीचे कापड रोखीने बाजारातून खरेदी केल्याचे दिसते. कापड खरेदीचे हिशोबाचे कागदपत्र पाहिले तर हे लक्षात येते की, 18 व्या शतकात महाराष्ट्रात व विशेषतः पुण्याच्या पेठेत कापड व्यापाऱ्यांची संख्या खूप मोठया प्रमाणात होती शिवाय दुसरे असे की, सरकारने केलेल्या अनेक खरेद्या अगदी लहान प्रमाणातही झालेल्या असत.[9]

अनेक सावकार हे पैशाचा व कर्जव्यवहाराच्या व्यवसायाबरोबर कापड व्यापाराचा व्यवसायही करीत असत. त्यामुळे पैशाच्या कर्जाच्या यादयात येणारी सावकाराची अनेक नावे तीच उधारीने कापड पुरविणाऱ्या व्यापाऱ्याच्या यादयातही आढळतात. 1768–69 साली पेशवे सरकारने पूर्वी ज्यांच्याकडून पैसे कर्जाऊ घेतले होते अशा सावकारांची नावे चित्पावन, ब्राह्मणाची दिसतात. नऊ देशस्थ ब्राह्मणाची आहेत आणि इतरात मराठा, शिंपी वगैरे आहेत. ध्यानात घेण्यासारखी एक गोष्ट अशी की यात एकही बिगर मराठी किंवा गुजराती नाव नाही. या तीस व्यापाऱ्याकडून एकूण सुमारे तीन लाख रूपये किंमतीचे कापड सरकारने उधारीवर खरेदी केले. या यादीतील काही तपशील पाहण्यासारखा आहे. रामचंद्र नाईक परांजपे यांच्याकडूनची कापड खरेदी सर्वात मोठी म्हणजे रूपये 54,732 ची आहे. काबरस, भिडे, पारगावकर, तारके, वानगळे इत्यादींच्याकडून खरेद्या रू. 10,000 ते 30,000 पर्यंतच्या आहेत आणि काही व्यापाऱ्यांकडून सरकारने फारच छोटया म्हणजे रूपये 1,000 हून कमी किंमतीच्या खरेद्या उधारीवर किंवा सरकारी उधारी खात्यावर म्हणून केल्या आहेत. उदा. तांबेकर यांच्याकडून 862 रू. चे उधारीवर कापड, दिनानाथ महाजन यांच्याकडून 675 रूपयांचे आणि गोपाळ कानडे यांच्याकडून केवळ 5,473 रूपयांचे कापड सरकारने आपल्या उधारीखात्यावर घेतले आहे. अशीच एक 1773 सालासंबंधीची सरकारी कापड खरेदीची यादी मिळते. त्यात पुणे बाजारपेठेतील 71 कापड व्यापाऱ्यांची नावे आलेली आहेत. त्यातील फक्त दोन नावे बिगर मराठी किंवा गुजराती असल्याचे दिसते. 1) छबिलदास बऱ्हाणपूर आणि 2) माधवदास गोडीदास यांचे होय.[10]

या व अन्य अशा यादयावरच असे दिसते की 18 व्या शतकाच्या उत्तरार्धात मोठया संख्येने मराठी व्यापारी वर्ग विशेषतः कापड व्यापारात गुंतलेला निर्माण झाला होता. व महाराष्ट्रातील बाजारपेठेत तो प्रभावीपणे व्यवहार करीत होता. त्याकाळात महाराष्ट्रात गुजरातसारखे बाहेरचे व्यापारी विशेषतः पुणे आसपासच्या बाजारपेठेत संख्येने कमी प्रमाणात होते. मोठे व्यापाऱ्यांत चित्पावन ब्राह्मण व त्या खालोखाल देशस्थ ब्राह्मण प्रमुख घटक होते.

18 व्या शतकात एकाही मराठी सावकाराने पाच लाख रूपया इतकीही रक्कम कधी एक रकमी कर्जाऊ दिल्याची नोंद आढळत नाही. सर्वसामान्यपणे एक रकमी मोठा आकडा कर्जाऊ म्हणजे 20,000 ते 50,000 रूपये पर्यंतचा. दुसरे असे की, पेशवे सरकारने सावकारांकडून ज्या रकमा कर्जाऊ घेतल्या त्या अनेकदा एक हजार रूपयांच्या आतल्याही असत.11 याचाच अर्थ असा होतो की, 18 व्या शतकाच्या उत्तरार्धात अल्प

कर्जव्यवहाराची त्याप्रमाणे छोटेखानी मराठी सावकारांची संख्या बरीच मोठी असल्याचे दिसून येते. परंतु त्यातून ज्याप्रमाणे वीरजी व्होरा व जगतशेठ यांच्यासारखे कोटयाधीश धनाढया सावकार परप्रांतात होते तसे सावकार महाराष्ट्रात निर्माण झाले नाही. त्या तोलामोलाचे श्रेष्ठी किंवा व्यवहारी निर्माण होऊ शकतील अशी आर्थिक संरचना आणि आवश्यक त्या दर्जाच्या तितक्या किफायतशीर घडामोडी तत्कालीन महाराष्ट्रात होत नसत असेच म्हणावे लागते.

ज्याप्रमाणे पुणे येथील सावकारांचे व व्यापाऱ्यांचे पेशवे सरकारशी व इतर संबंधितांशी आर्थिक व्यवहार चालत असे तसे ते बाहेरील सत्ताधाऱ्यांशीही असत.

18 व्या शतकात पुणे व आसपासच्या प्रदेशात मोठया प्रमाणात कर्जाची देणाण–घेवाण, जिन्नसांची खरेदी–विक्री इत्यादींनी युक्त असा अपूर्व आर्थिक बदल मराठी समाजात घडून येत होता. त्या प्रक्रियेचा गुणक परिणामी इतर आर्थिक क्षेत्रात व आसपासच्या प्रदेशात पसरणे अर्थ व्यवहाराला धरून होते.

कर्जाऊ रकमेची फेड करताना चलनातील बदल लक्षात घेतले जात असत. चांदवड रूपयातील चांदीचे प्रमाण तपासून घेऊन बट्टा कापून घेत असत. कर्ज घेताना सिक्क्यांचा भाव करून बट्टा लक्षात घेऊन हिशेब केला जात असे. या प्रकरणी ऐतिहासिक कागदपत्रातून दिसून येते की, सावकार कशा प्रकारे बट्टा वसूल करीत असत.

### *गरीब सावकार व व्यावसायिकांना उत्तेजनार्थ सवलती :*

पुण्यातील बाजारपेठेशी व्यवहार करणाऱ्या बाहेरील मराठी व्यापाऱ्यांची संख्या आणि त्यांच्या व्यवहाराचे प्रमाण कालानुसार वाढत गेले हे बहुधा छोटे व्यापारी किंवा वाणी असत. या व्यापाऱ्यांनी सरकारला केलेल्या विनंती अर्जात किंवा सरकारने त्यांना लिहिलेल्या उत्तरात वा सनदात त्यांचा उल्लेख 'गरीब साहुकार' असा होत असे. या छोटया व्यापाऱ्यांना व गरीब साहुकारांना व्यावसायिक उत्तेजन देण्यासाठी सरकार प्रयत्न करी, जकातीत वगैरे काही काळाकरीता सूट किंवा माफी देत असे. हे इ.स. 1763–64 च्या खालील सनदेवरून लक्षात येईल. पुणे व जुन्नर प्रांतात वाणी उदमी देशातून तेल, तूप, गूळ व हळद ऐसा जिन्नस घेऊन येतात त्यास सांप्रत या जिनसांची अमदानी जाहली पाहिजे... तरी सदरहू जिनसास दसऱ्यांपर्यत जकात सुदामत शिरस्त्यापैकी निमे घेत जाणे निमे माफ करीत जाणे.तंबाखू, मीठ, नारळ, तूप इत्यादी जिनसांच्या विक्रीचे वेगवेगळया प्रदेशाबाबत ठराविक काळातील मक्ते देण्यात येत आणि असे व्यापारी मक्ते महाराष्ट्रातील वेगवेगळया भागात अनेक जातीचे व्यापारी लोक योग्य ती परवाना रक्कम भरून मिळवित. 1763–64 मध्ये महादाजी नारायण व सदाशिव रघुनाथ कमाविसदार जकात प्रांत पुणे व जुन्नर यांनी सरकारला अर्ज केला होता की, ''पुण्यात वाण्याउदम्यांची आमदानी होऊ लागली. त्यास कोणाकोणापासून जकात घ्यावी न घ्यावी येविशीची आज्ञा जाहली पाहिजे.''[13] त्यास सरकारने या संबंधीचे आपले धोरण तपशिलवार जाहीर केले. सरकारी दुकाने चालवणारे छोटे व्यापारी असत. त्यांना सुरूवातीचे भांडवल म्हणून सरकारकडून साधारणपणे दरसाल 12%दराने व्याजाने पैसे कजाऊ मिळत असे आढळून येते.

18 व्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रातील वेगवेगळया भागातून छोटे व्यापारी, वाणी, कारागीर इत्यादी विविध तऱ्हेचे व्यावसायिक पुण्याकडे मोठया संख्येने स्थलांतर करू लागले. तसे ते महाराष्ट्राच्या बाहेरूनही येऊ लागले. त्यामुळे त्यांना सामावून घेण्यासाठी शहरात नवनवीन पेठा वसवाव्या लागल्या. पेठेतील व्यापारी कारभारावर सरकारची देखरेखही आवश्यक असे. त्यामुळे पारंपारिकपणे शेटेपण व महाजनपद करणाऱ्या मंडळींना नव्याने महत्त्व आहे व त्यांचे कामही वाढले. परिणमतः शेटे, महाजनकीचे काम करण्यासाठी या क्षेत्रात नव्यानेच इतर क्षेत्रातील माणसेही पुढे येऊ लागली व यासंबंधी सरकारशी करारमदार करू लागली. 18 व्या शतकाच्या सुरूवातीस पुण्यात केवळ पाच पेठा होत्या त्यांची संख्या वाढत जाऊन त्या शतकाच्या अखेरीस शहरात अठरा पेठा झाल्या आणि त्या वसवण्यात सरकारी कारभारी व शेटे महाजनाबरोबर सावकार मक्ता घेऊन बाहेरील कारागीर आणून पुरविणारे मध्यस्थ इमारतीच्या बांधकामाचे मक्तेदार इत्यादी अनेकांचा सहभाग घडू लागला. पुण्याप्रमाणेच महाराष्ट्रातील इतर नगरांकडेही नव्याने स्थायिक होण्यासाठी व्यापाऱ्यांचा व कारागिरांचा ओघ सुरू झाला आणि पेशवे सरकारकडून याला प्रोत्साहन म्हणून नवागत सावकारांना, व्यापाऱ्यांना जकातमाफी करणे, मानाची वस्त्रे देणे, पालखी इत्यादी मानाचे हक्क देणे, गावात राहण्यासाठी मोफत वाडा देणे किंवा कोठार बांधण्यास मोफत व जमीन देणे इत्यादी हक्क, सवलती दिल्या जाऊ लागल्या.[14]

### *कार्यपध्दती :*

पेशवेकाळात आर्थिक मदत करणाऱ्या अल्पसंख्य सावकाराकडे विशेष लक्ष दिले जात होते. सावकार आपल्या ऋणकोच्या संपर्कात येत असत. समाजातील प्रत्येक घटक सावकाराच्या संपर्कात येत असली तरी सावकार व ऋणको यांचे संबंध चांगले असायचे. सावकारांची अनेक कामे होती. एक ते सैनिकांना, सेनापतींना, रोजगारांना कर्जे देत होती. दुसऱ्या प्रकारचे सावकार सरकारला अर्थपुरवठा करीत होते. सरकारला आगाऊ उचल व कर्जे देत लष्करी कर्जाच्या वेळी किंवा युध्दाच्या वेळी वेगवेगळया स्वरूपात कर्जे दिली जात होती. छावणीतील बाजाराजवळ फिरती सावकारी पेढी उघडली जात होती. हुंडया देण्यात येत होत्या, कर्जे देण्यात येत होती. एक प्रकारे 18 व्या शतकातील महाराष्ट्र सावकारांचा हा वर्ग अर्थ सत्ता आपल्या हाती ठेवून सरकारवर नियंत्रण प्रस्थापित करीत होता. एवढेच नव्हे तर सावकार पत्रव्यवहाराची सेवाही पुरवित होते. आजच्या वृत्तपत्रांचे किंवा दूरदर्शनचे माहिती पुरविण्याचे काम त्या काळात सावकारच करीत होते. अशा प्रकारचे काम करणाऱ्यांना खिदमतगार खासदार, निर्धा, काशिद, राऊत इ. नावे होती. नियमित काम करणारी पथके सावकारांच्या पदरी होती व ते दलालीवर काम करीत. मालक त्यांना जासूद, काशिद, राऊत म्हणत होते. पथकाला जथ्था देखील म्हणत असत. त्यांच्यासोबत शस्त्रधारी सैनिक तुकडी देखील संरक्षणासाठी असे. सरकार देखील रणांगणावर पैसे पाठविण्यासाठी या जथ्थ्यावर अवलंबून असे. जथ्थेदारासोबत रक्कम पाठवित असताना सरकार जथ्थेदाराच्या नावाचा उल्लेख करीत असे. सावकाराजवळ लोक महसूल देत असत. तो महसूल सावकार हा शेतकऱ्यांच्या वतीने सरकारी प्रतिनिधीजवळ देत असे.

लष्कराला वेतन देणे, नाण्यांचा पुरवठा करणे, कापड, दारूगोळा इत्यादीचा पुरवठा करणे त्यांचे ठेके या सावकारांना मिळत असे. राज्यातील सावकारांना कमाविसदाराची हमी घेत असत. सरकारी वसुली (वरात) ची ताकीद कमाविसदारास पाठविली जात होती. त्याच्याबरोबर देणे असल्यास वसुलीच्या सूचना केल्या जात होत्या. सावकाराची देणी असल्यास ती देण्यात येत होती. या व्यवहारामध्ये सावकार आपल्या ग्राहकांना त्यांच्या पैशाची हमी देऊन सरकारला मदत करीत असत. दररोजचे आर्थिक व्यवहार सुरळीत पार पाडीत असत. वरात या काळात अत्यंत लोकप्रिय आणि आवश्यक पध्दत झाली होती. वरात आणि हुंडी यांनी कागदी चलनाची जागा घेतली होती.[15]

सरदार आणि लष्करी अधिकारी सरकारी देणी देण्यासाठी सावकाराकडून कर्जे काढीत असत. त्याचे उदाहरण असे दामाजी गायकवाड यांना सरकारी देणे होते व रक्कम बरीच मोठी होती म्हणून त्यांनी सावकाराकडून 8 लक्ष 40 हजार कर्ज घेतले.[16] त्यावेळची वाहतूक आणि दळणवळण अत्यंत खडतर होती. रोख रक्कम त्यावेळी उंटाच्या किंवा बैलाच्या पाठीवरून वाहून नेली जात असे. ही पध्दत अत्यंत धोकादायक होती. हुंडीचे जे व्यापारी कागद किंवा बिलाबद्दल रक्कम देण्याची पध्दत स्वीकारीत होते ती सुरक्षित होती म्हणून सावकारीचा व्यवसाय तेजीत होता.

सरकारी अधिकारी व स्वतः पेशवे विविध कारणासाठी कर्ज घेत असत. त्याचा तपशील ऐतिहासिक कागदपत्रावरून दिसून येते. पेशव्यांनी कापडव्यापारी सावकाराकडून उधारीवर मोठया प्रमाणावर कापड खरेदी केली होती. ही उधारीची रक्कम कर्जाच्या रूपात व्याजाने द्यावी लागे. तसेच सोने खरेदी व अन्य जिन्नसही उधारीवर खरेदी करून त्याचे कर्जात रूपांतर होत असे असे ऐतिहासिक कागदपत्रावरून दिसून

येते.

***संदर्भ***


| | |
|---|---|
| 1)डॉ. सरदेसाई, बी.एन. | 'मराठयांचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इतिहास' फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्र.आ. 2001, पृ. क्र.189 |
| 2)तत्रैव | पृ. क्र. 190 |
| 3)तत्रैव | पृ. क्र. 190 |
| 4)तत्रैव | पृ. क्र. 191 |
| 5)चिटणीस, कृ.ना. | 'मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था' भाग–4, पुणे, 1985, पृ. कृ. 69 |
| 6)तत्रैव | पृ. क्र. 69 |
| 7)तत्रैव | पृ. क्र. 71 |
| 8)तत्रैव | पृ. क्र. 72 |
| 9)कुलकर्णी, अ.रा. आणि | 'मराठयांचा इतिहास' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे–2006, खंड–2 |
| 10)खरे, ग.ह. | 'मराठयांचा इतिहास' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे–2006, खंड–2 |
| 11)तत्रैव | पृ. क्र. 355 |
| 12)तत्रैव | पृ. क्र. 361 |
| 13)तत्रैव | पृ. क्र. 363 |
| 14)तत्रैव | पृ. क्र. 365 |
| 15)पुराभिलेख पुणे | पृ. क्र. 20 |
| 16)पेशवे दप्तर | खंड–2, पृ. क्र. 219 |

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org